अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
ठराव क्र.:- १/१८२
दिनांक :- १४/५/२०१८.

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:-अतिमआ(वि.)/उआ(सा.प्र.)/आस्था /१४०४
दिनांक :- १४/०५/२०१८ .

## आज्ञापत्र

**विषय :-** सेवेत असतांना मयत झालेल्या सेवकांच्या वारसांस अनुकंपा तत्त्वाने मनपा सेवेत घेणेबाबत.

**संदर्भ :-** १)शासन निर्णय क्र.अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१/०९/२०१७
२) मा. अति. महा. आयुक्त (ज.) ठ. क्र. १/७१, दि. १३/०४/२०१८.

मनपा सेवेत असतांना सेवक मयत झाल्यास अशा सेवकांच्या कुटुंबियांचे हाल होवू नयेत म्हणून त्यांच्या वारसांस काही अटींवर सेवानिवड समिती या कक्षेतून वगळून अग्रक्रमाने मनपा सेवेत अनुकंपा तत्त्वावर घेण्याबाबतचे धोरण मनपा प्रशासनाने स्विकारलेले असून ह्या बाबत मे. शासनाकडून प्रस्तृत करण्यात आलेल्या अटी व शर्ती नुसार नेमणूक देण्याची कार्यवाही केली जाते. या बाबत संदर्भ क्र.१ अन्वये अद्यायावत शासन निर्णय प्रस्तृत करण्यात आला आहे.

खालील उमेदवार हे सेवेत असतांना मयत झालेल्या सेवकांचे वारस आहेत. त्यांची **लिपिक टंकलेखक** (पे. बॅन्ड रु. ५२०० - २०२०० + ग्रेड पे १९०० + मान्य भत्ते) हुद्यावर शेड्युलमान्य रिकाम्या जागेवर नेमणूक करणेस सं. क्र. २ चे ठरावान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

वारस नेमणुकीबाबत खालील दर्शविल्याप्रमाणे **लिपिक टंकलेखक** या त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या वेतन श्रेणी (पे. बॅन्ड. रु. ५२०० - २०२०० + ग्रेड पे १९०० + मान्य भत्ते) च्या रिकाम्या जागेवर आपली आज्ञापत्राचे दिनांकापासून अगर प्रत्यक्ष हजर होतील त्या दिनांकापासून खालील तपशीलाप्रमाणे शेड्युलमान्य रिकाम्या जागेवर हंगामी नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र | सेवकाचे नाव व पत्ता | हुद्दा | तपशील |
|---|---|---|---|
| १. | **श्री.पराग पद्माकर ओगले .** (इमाव) नियुक्तीचा गट खुला पत्ता : रा.४२३, **गणेश पेठ,** पुणे-२.  | लिपिक टंकलेखक सामान्य प्रशासन विभाग, मनपा. | पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडील सेविका कै. विजया पद्माकर ओगले हुद्दा:उपशिक्षिका यांचे दि.१८/०६/२०१० रोजी निधन झाले आहे. त्यांचा वारस मुलगा **श्री.पराग पद्माकर ओगले** यांची अनुकंपा तत्त्वानुसार लिपिक टंकलेखक (पे. बॅन्ड. रु. ५२०० - २०२०० + ग्रेड पे १९०० + मान्य भत्ते) या हुद्यावर हंगामी नेमणूक मान्य. |

१) वरील उमेदवारास मनपा सेवाविनिमयानुसार वेतन व भत्ते आदा करण्यात यावे.

२) वरील उमेदवाराची नेमणूक पूर्णपणे हंगामी स्वरुपाची असून सेवाविनियम १० (अ) नुसार परिविक्षाधीन पद्धतीने करण्यात येत आहे. परिविक्षाधीनतेचा २ वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी २ महिने अगोदर सदर उमेदवारांची नेमणूक पुढे चालू ठेवणेविषयीचा अभिप्राय संबंधित मा.खातेप्रमुख यांनी आमच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. वरील उमेदवाराचे काम समाधानकारक न झाल्यास अगर कामावरील हजेरी अनियमित असल्यास तसेच दाखल केलेली माहिती व कागदपत्रे यामध्ये तफावत आढळून आल्यास वरील उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना (नोटीस) न देता केव्हाही कोणत्याही वेळी मनपा सेवेतून कमी करण्यात येईल.

३) वरील उमेदवाराने नेमणूकीच्या खात्याकडे रुजू होतेवेळी नियमानुसार सेवा अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/सेवा-४ मंत्रालय, मुंबई -३२, दि. ३१/१०/२००५ नुसार सेवेत दि. ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन ऐवजी पारिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात येईल.

**५) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. एसआरव्हि - २०००/प्र. क्र. १७/२०००/१२, दि.०१/०७/२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटुंबाचे प्रतिज्ञापन)नियम-२००५ मधील प्रतिज्ञापत्राच्या नमुना - अ नुसार तो उमेदवाराने नेमणूकीच्या खात्याकडे रुजू होताना भरुन देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास संबंधित खात्याने हजर करुन घेवू नये.**

**६) महाराष्ट्र शासन निर्णय क्रंमाक :चारित्र्य -२०१७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ, दि.२८/०८/२०१७ अन्वये उमेदवाराने पोलीस यंत्रणेमार्फत आज्ञापत्रकाच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आत चारित्र्य पडताळणी करून त्याच्याविरुध्द कोणतेही गुन्हे नोंदविण्यात आले नाहीत. अथवा गुन्हा सिध्द झालेला नाही. असे प्रमाणपत्र प्राप्त करून मा.उप आयुक्त सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावे. शासन निर्णयातील तरतूदीनुसार वारस उमेदवाराकडून सुधारित सांक्षाकित फॉर्म घेवून व चारित्र्य पडताळणी दाखला आज्ञापत्रकाचे दिनांकानंतर २ महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीस अधीन राहून तात्पुरते आज्ञापत्र प्रस्तृत करण्यात येत आहे. शासन निर्णयातील क्र.५ मध्ये चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी**

**अहवाल समाधानकारक असल्यास तात्पुरते नियुक्तीपत्र कायमस्वरूपी नियुक्तीस पात्र ठरविण्यात येईल.**

७) मनपा सेवाविनियम व सेवावर्तणूक नियमांचे पालन करणेबाबतच्या सूचना संबंधित मा.खातेप्रमुख यांनी सदर उमेदवारास देणेची तजविज करावी.

८) **संबंधित उमेदवाराने मे. राज्य शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. अकंपा – १०१४, प्र. क्र. १६४/आठ, दि. २०/०५/२०१५ नुसार " अनुकंपा तत्वावर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवरांना विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र ( मराठी टंकलेखनाची ३० श. प्र. मी. किंवा इंग्रजी ४० श. प्र. मी.) प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी २ वर्षाची मुदत पुढील अटीच्या अधिनस्त देण्यात येत आहे."**

९) **महाराष्ट्र शासन निर्णय क्र. प्रशिक्षण – २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ अन्वये संबंधित उमेदवाराने हजर झालेच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत शासनाची संगणक विषयक एम. एस. सी. आय. टी. परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सदर परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास त्याची नेमणूक संपुष्टात आणण्यात येईल, असा उल्लेख आहे.**

१०) संबंधित उमेदवार हे महानगरपालिकेच्या सेवेते नियुक्ती केल्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहतील.

११) संबंधित उमेदवारांनी संबंधित खात्यात नेमणूक केल्यानंतर त्यांनी सदर खात्यात हजर व्हायचे आहे व त्या खात्यात संबंधित उमेदवाराने सेवाप्रवेश करतांना जन्मतारखेबाबत उतारा/दाखला हजर करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराकडे अशा प्रकारे दाखला नसेल त्यांच्याबाबतीत शाळा सोडल्याचा दाखला, शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र यामध्ये नमूद केलेली जन्मतारीख ग्राह्य धरण्यात येईल. परंतु अशा उमेदवारांची भविष्यात जन्मतारीख बदलण्याची विनंती मान्य करता येणार नाही. याबाबतची स्पष्ट कल्पना संबंधित उमेदवार यांस देण्यात यावी. तद्नंतर काही कायदेशीर बाब निर्माण झाल्यास त्यास संबंधित खाते जबाबदार राहील.

१२) वरील उमेदवाराने नेमणूकीचे खात्यात/विभागात हजर होण्यापूर्वी जन्म दिनांकाबाबत जरुर ती पुराव्याची कागदपत्रे संबंधित मा. प्रशासन अधिकारी यांना दाखवावीत व त्यांच्याकडून मा. आरोग्य अधिकारी, पुणे मनपा यांचे नांवे शारिरिक तपासणी करुन घेण्यासाठी पत्र घ्यावे, मा. आरोग्य अधिकारी यांचेकडून पूर्वनियोजित वेळेनुसार शारिरिक तपासणी करुन घ्यावी व शारिरिक पात्रतेचा दाखला प्राप्त करुन घ्यावा, असा दाखला असल्याशिवाय संबंधित उमेदवाराला खातेप्रमुखांनी कामावर हजर करुन घेऊ नये.

१३) वरील उमेदवाराने सदर आज्ञापत्राचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत नेमणूकीचे विभागात हजर होणे बंधनकारक आहे. वरील उमेदवारास मनपा सेवेचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी मनपास १ महिन्याची पूर्वसूचना (नोटीस) देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे पूर्तता न केल्यास १ महिन्याच्या पूर्वसूचनेकरिता आवश्यक असलेल्या मुदतीचा सर्व भत्त्यांसह पगार त्याच्याकडून वसूल करण्यात येईल.

१४) पुणे महानगरपालिका सेवाभरती नियम, २०१४ नुसार नियुक्ती कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

१५) वरील उमेदवार यांनी नेमणूकीचे संदर्भात जात, शैक्षणिक पात्रता, जन्म दिनांक, अनुभव इ. बाबत सादर केलेली माहिती केव्हाही असत्य आढळुन आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

१६) सदर आज्ञापत्रात नमुद केलेल्या बाबींची वरील उमेदवारास समज देवून त्याची समज मिळाल्याबाबत आज्ञापत्राचे एका प्रतीवर स्वाक्षरी घ्यावी व त्याप्रमाणे आस्थापना विभागाकडे अहवाल सादर करावा.

तरी, वरील बाबींची संबंधित उमेदवाराने जरुर ती तजविज करावी.

कळावे.

11.05.18

(शीतल तेली-उगले)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)**
**पुणे महानगरपालिका**

प्रत :- १. मा. प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन व आस्थापना विभाग
२. संबंधित उमेदवार - श्री.पराग पद्माकर ओगले
३.मा.मुख्य कामगार अधिकारी
४.मा.मुख्य लेखापाल व वित्त अधिकारी-निवृत्ती वेतन विभाग
५.मा.मुख्य लेखापाल व वित्त अधिकारी
६.शिक्षण विभाग
७.मा.प्रशासन अधिकारी-अंतर्गत अर्था.

(अनिल मुळे)
**उप आयुक्त (सामान्य प्रशासन)**
**पुणे महानगरपालिका.**